**पंतप्रधानांची अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांशी चर्चा**

11 डिसेंबर 2025

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली.

दोन्ही नेत्यांनी भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधातील प्रगतीचा आढावा घेतला आणि महत्त्वाच्या प्रादेशिक व जागतिक विकासाच्या मुद्यांवर यावेळी चर्चा झाली.

जागतिक शांतता, स्थैर्य व संपन्नता यांच्यासाठी भारत व अमेरिका सातत्याने काम करतील याचा पंतप्रधान मोदी व अध्यक्ष ट्रम्प यांनी पुनरुच्चार केला.

X वरील एका पोस्टमध्ये श्री. मोदी यांनी म्हटले की:

“राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी चांगली चर्चा झाली. आमच्या द्विपक्षीय संबंधांतील प्रगतीचा आम्ही आढावा घेतला आणि प्रादेशिक व जागतिक विकासाच्या मुद्यांवर चर्चा केली. जागतिक शांतता, स्थैर्य व संपन्नता यांच्यासाठी भारत व अमेरिका सातत्याने काम करतील.

@realDonaldTrump

@POTUS”

नवी दिल्ली

11 डिसेंबर 2025